# प्रेसनोट

दि.०१.०४.२०१९

**शिर्षक - तक्रारदार यांना ६ ड चा उतारा देण्यासाठी १५०/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारल्यानंतर बाळासो यमा हजारे, कोतवाल, रेकॉर्ड रूम, उत्तर तहसील कार्यालय, सोलापूर रंगेहात पकडले.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | पुणे परीक्षेत्र, सोलापूर युनिट |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | सदर बझार पोलीस स्टेशन सोलापूर ग्रामीण , गुरनं /२०१९ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | बाळासो यमा हजारे, कोतवाल, रेकॉर्ड रूम, उत्तर तहसील कार्यालय, सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ५००/- रूपये मागणी करून तडजोडी अंती १५०/- रूपयेची मागणी |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १५०/- रूपये. |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांनी त्यांचे मालकीचे जागेचा ६ ड उतारा काढण्यासाठी उत्तर सोलापूर तहसील येथे मागणी केली होती. सदर उतारा देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे आलोसे श्री. हजारे यांनी ५००/- लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कडे तक्रार दिली होती.<br>त्यावरून सदर तक्रारीची दि.०१.०४.२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांच्याकडून पडताळणी करण्यात आली होती. त्यामध्ये तक्रारदार यांच्याकडे अलोसे हजारे यांनी ५००/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी लाचेची रक्कम कमी करण्याची विनंती केली असता तडजोडी अंती १५०/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून लावण्यात आलेल्या लाचेच्या सापळ्यामध्ये कोतवाल हजारे यांना १५०/- रूपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहात पकडण्यात आले आहे. यातील बाळासो यमा हजारे, कोतवाल, रेकॉर्ड रूम, उत्तर तहसील कार्यालय, सोलापूर, रा. मार्डी, ता. उत्तर सोलापूर यांच्या विरूध्द सदर बझार पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.शी संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | पोलीस उपअधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो, रंगभवन चौक, सोलापूर ४१३४०३. |
| संकेत स्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | acbwebmail@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार ॲप | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२१७-२३१२६६८ |
| व्हॉटसॲप क्रमांक | :- | ९९३०९९७७०० |

(जगदीश भोपळे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर

Scanned by CamScanner